# सर्व फार्मसी पदविका (D.PHARM.) व पदवी (B.PHARM)
# उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी

# आवाहन

आपणास कल्पना आहेच की, फार्मसी पदविका/पदवी (डी.फार्म./बी.फार्म.) मान्यताप्राप्त महाविद्यालयातून उत्तीर्ण झाल्यानंतर फार्मासिस्ट म्हणून पंजीकरणाकरीता अर्ज दाखल करण्यासाठी महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचे हे कार्यालय आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रात २१५ डी.फार्म कोर्सची व १५५ बी.फार्म. कोर्सची महाविद्यालये आहेत. या सर्व महाविद्यालयामधून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी पंजीकरणासाठी अर्ज सादर करतात. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी परिषदेतर्फे ऑनलाईन पंजीकरण प्रणाली ही सुविधा दिनांक ७ ऑगस्ट, २०१८ पासून कार्यान्वित करण्यात येत आहे. याबद्दल योग्य ती सूचना व त्याविषयीची विस्तृत व तपशीलवार माहिती संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रात प्रसिध्द केली होती.

तथापि दिनांक ७ ऑगस्ट,२०१८ पासून पंजीकरण बंद होणार आहे, ऑनलाईन पंजीकरणाकरीता ऑनलाईन परिक्षा /CET द्यावी लागणार आहे, ऑनलाईन पंजीकरणाची प्रक्रिया खूप लांब असून जास्त वेळ लागण्याची शक्यता आहे अशा प्रकारच्या अफवा विद्यार्थ्यांमध्ये पसरत असल्याचे कालपासून निदर्शनास आले आहे. त्यामुळे अचानक परिषदेच्या कार्यालयामध्ये पंजीकरणासाठी मोठी गर्दी झाली व रेटारेटीत काही विद्यार्थ्यांना इजा झाली.

तरी सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, सदर अफवांमध्ये कोणतेही तथ्य नसून पंजीकरण अर्ज सादर करण्यासाठी कार्यालयामध्ये गर्दी करु नये. आपल्यासाठी सुरु केलेल्या ऑनलाईन पंजीकरण प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा व कार्यालयाचे काम जलद व सुरळीत होण्यासाठी मदत करावी.

ठिकाण :- मुलुंड, मुंबई — निबंधक

दिनांक :- ४.०८.२०१८ — महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद